# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी पोर्टल-२०२२-२३/ (२०७/२३)/शिष्यवृत्ती/ १५० दिनांक : ११.०१.२०२३

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अधिनस्त अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये यांच्या स्वीय प्रपंजी लेख्याच्या तपासणी अहवालाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०२१-२२/ केंद्र पुरस्कृत/ शिष्यवृत्ती/७५ दि. ०३.०१.२०२३.

उपरोक्त विषयाबाबत शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या स्वीय प्रपंजी लेख्याच्या तपासणी कार्यक्रमाबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

**अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये अवितरीत शिष्यवृत्ती रक्कम असण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच अवितरीत शिष्यवृत्तीमध्ये अंदाजे रक्कम रु. १.०० कोटी महाविद्यालयांमध्ये पडून असल्याचे दिसून येत आहे.**

तरी याबाबत, **अशासकीय अनुदानित महाविद्यालये यांच्या स्तरावर शिष्यवृत्ती रक्कम अवितरीत आहे किंवा कसे याबाबतचा सविस्तर आणि अचूक अहवाल सोबत दिलेल्या तक्त्यामध्येच मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅट मध्ये फक्त मराठी फॉन्ट DV-TTSUREKH मध्येच आणि तीच माहिती प्राचार्यांनी स्वाक्षरी केलेली पीडीएफ स्वरुपात सॉफ्ट कॉपी पेन ड्राईव्ह मध्ये आणि हार्ड कॉपी या खालीलप्रमाणे महाविद्यालयीन कर्मचाऱ्यामार्फत उपस्थित फक्त हस्तपोहोच सादर करावी.**

| अ.क्र. | जिल्ह्यामधील अशासकीय अनुदानित महाविद्यालये | स्थळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे शहर आणि पुणे ग्रामीण | प्रो. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पिंपरी चिंचवड, पुणे | १३.०१.२०२३ | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० |
| २ | अहमदनगर जिल्हा आणि नाशिक जिल्हा | प्रो. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पिंपरी चिंचवड, पुणे | १४.०१.२०२३ | सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० |

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत – विवरणपत्र

**महाविद्यालयाचे नाव : -**

| **अनु.क्र.** | **वर्ष** | **योजनांची नावे** | **अवितरीत रक्कम रु.** | **अवितरीत शिल्लक राहण्याची कारणे** | **अवितरीत रक्कमेवर केलेली कार्यवाही** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | | | | |
| २ | | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना | | | | |
| ३ | | एकलव्य आर्थिक सहाय्य | | | | |
| ४ | | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) | | | | |
| ५ | | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) | | | | |
| ६ | | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | | | | |
| ७ | | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती | | | | |
| ८ | | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | | | | |
| ९ | | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | | | | |
| १० | | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | | | | |
| ११ | | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती | | | | |
| १२ | | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | | | | |
| १३ | | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | | | | |
| १४ | | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-२) | | | | |

**टिप : - फक्त उच्च शिक्षण विभागामार्फत वितरीत करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती द्यावी. इतर विभागाकडून वितरीत करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती देऊ नये.**